SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE

(असाधारण)

शुक्रवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०२५

विनियम क्रमांक ३०/२०२५

विद्यापीठ आरोग्य केंद्रातील मसाज उपकरणे (Fitness Unit) हाताळण्याबाबतचे विनियम, २०२५

ज्याअर्थी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ५(६) नुसार आरोग्य केंद्र स्थापन करण्याचे प्रावधान आहे.

आणि

ज्याअर्थी व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडून १० व्या योजने अंतर्गत मंजूर झालेल्या अनुदानामधून विद्यापीठ परिसरामध्ये विद्यापीठ आरोग्य केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. (व्यवस्थापन परिषदेची सभा दि. ३०/०८/२००३, विषय क्र. ३९७ अन्वये परवानगी प्रदान केलेली आहे.

आणि

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ चे कलम ५(८) नुसार आरोग्य केंद्र समाविष्ट करण्यात आले आहे.

आणि

ज्याअर्थी विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे रू. १५,००,०००/- अनुदान आरोग्य केंद्राकरीता प्राप्त झाले. त्यापैकी (i) आरोग्य केंद्र इमारत बांधकाम व फर्निचरकरीता रू. ८ लक्ष व (ii) उपकरणे व साहित्यांकरिता रू. ७ लक्ष खर्च करण्यास अनुमती प्रदान करण्यात आली.

आणि

ज्याअर्थी व्य.प. समोर बाब क्र. ६८ दि. १७/१८.०२.२००७ च्या सभेत घेतलेल्या निर्णयानुसार दि. ०१.०४.२००७ पासून आरोग्य केंद्रात तपासणी करीता येणाऱ्या रूग्णाकडून रू. ५/- नोंदणी शुल्क (Registration Fee) घेण्यात येत आहे. (कार्यालयीन सुचना क्र. २१/२००७).

आणि

ज्याअर्थी विद्यापीठ निधीतुन लोकहितास्तव उपलब्ध झालेल्या अर्थसहाय्यातुन विद्यापीठातील कार्यरत अधिकारी / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शारीरिक व्याधी मसाज उपकरणांद्वारा काही प्रमाणात दूर करण्याचे उद्देशाने आरोग्य केंद्रात आधुनिक मसाज उपकरणे खरेदी करण्यात आलेले आहेत.

आणि

ज्याअर्थी आरोग्य केंद्रात आधुनिक मसाज उपकरणांची देखभाल, उपयोग, सुरक्षा आदिबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ चे कलम ७५ नुसार विनियम विनियम तयार करणे अनिवार्य झाले आहे.

आणि

ज्याअर्थी आरोग्य केंद्रात आधुनिक मसाज उपकरणे **(Fitness Unit)** सर्व संबंधीतांच्या उपयोगाकरीता कार्यान्वित केलेल्या उपकरणांची दैनंदिन देखभाल करणे, आरोग्य केंद्र तसेच केंद्राबाहेरील परिसर स्वच्छ ठेवणे, आधुनिक मसाज उपकरणांचा उपयोग कर्त्यांवर नियंत्रण ठेवणे, त्यांची माहिती ठेवणे, शुल्क आकारणी असल्यास शुल्क स्विकारणे, प्राप्त झालेले शुल्क दैनंदिन विद्यापीठ खाती जमा करणे, उपकरणांचा दैनंदिन रखरखाव ठेवणे, तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची पुर्व सूचना आरोग्य अधिकारी तसेच कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना देणे, आदि बाबी करून घेणे अनिवार्य आहे.

त्याअर्थी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ चे कलम 31(f) नुसार विनियम तयार करीत आहे.

१. या नियमांना विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातील आधुनिक मसाज उपकरणांच्या **(Fitness Unit)** हाताळण्याबाबतचे तसेच देखभालीचे विनियम - २०२५ असे संबोधण्यात येईल.

२. सदर विनियम व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केलेल्या दिनांकापासुन अंमलात येतील.

३. या विनियमामध्ये उल्लेख केल्या जाणाऱ्या शब्दांचे अर्थ खालीलप्रमाणे राहतील.

i. **"विद्यापीठ" म्हणजे** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ कायदा १९८३ अन्वये गठीत विद्यापीठ

ii. **"कुलसचिव" म्हणजे** - महाराष्ट्र विद्यापीठे कायदा-२०१६ मधील तरतुदीनुसार नियुक्त करण्यात आलेले कुलसचिव

iii. **"विद्यापीठ आरोग्य केंद्र" म्हणजे** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परीसरात विद्यापीठ अधिकारी / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांच्या आरोग्याची तपासणी व उपचाराकरिता कार्यान्वित करण्यात आलेले व महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ चे कलम ५(६) नुसार स्थापन झालेले केंद्र

iv. **"आधुनिक मसाज उपकरणे" म्हणजे** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ निधीतून विद्यापीठातील अधिकारी / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांना असलेल्या शारीरिक व्याधी आधुनिक मसाज यंत्राचे सहाय्याने दूर करण्याच्या उद्देशाने विद्यापीठ परीसरातील आरोग्य केंद्रात कार्यान्वित करण्यात आलेले आधुनिक मसाज उपकरणे.

v. **"उपकरणांचा उपयोग, देखभाल व उपाययोजना" म्हणजे** - निर्धारित कालांतरामध्ये विद्यापीठ आरोग्य केंद्रातील आधुनिक मसाज उपकरणांची हाताळणी, पडताळणी व देखरेख करण्यासाबाबतच्या उपाययोजना.

vi. **"नियंत्रण अधिकारी" म्हणजे** - विद्यापीठ आरोग्य अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

vii. **"सदस्य" म्हणजे** - आधुनिक मसाज उपकरणांचा उपयोग घेण्याकरिता या विनियमाने विहित केलेल्या सदस्यांकडून निर्धारित केलेले शुल्क भरून/निःशुल्क सदस्यत्व प्राप्त करणाऱ्या व्यक्ती

viii. **"प्रभारी अथवा नियुक्ती केलेले कर्मचारी" म्हणजे – विद्यापीठ आरोग्य अधिकारी यांनी** नियुक्त केलेल्या कर्मचारी/व्यक्तीकडून समाधानकारकरित्या कामे करण्यात आले किंवा नाही याबाबतची खात्री करणारा, तसेच उपकरणे हाताळण्यासंबंधीत विहीत केलेले शुल्क यांचे शोधनाकरिता वित्त विभागाकडे पाठविण्याकरिता विद्यापीठ आरोग्य केंद्र यांच्याकडून नियुक्त करण्यात आलेला/आलेले कर्मचारी.

४. **विद्यापीठ आरोग्य केंद्रात स्थापित करण्यात आलेली आधुनिक उपकरणे** - नियंत्रण अधिकारी आधुनिक मसाज उपकरणांची यादी तयार करेल, ज्याचा समावेश ज्या उपकरणांचा रखरखाव करण्याच्यादृष्टीने उपयुक्त राहील. सदर यादीमध्ये उपकरणाचे नांव, नंबर, तपशिल, या उपकरणांना अनुक्रमांक प्रदान केला असल्यास अनुक्रमांक, खरेदीची तारीख, उपकरणांची किंमत, आश्वस्ती कालावधी (Warranty Period) आदि बाबींचा समावेश राहील.

५. **दैनंदिन/मासिक देखभाल** - दैनंदिन/मासिक देखभाल नियंत्रण अधिकारी प्रभारी व्यक्तीच्या सहाय्याने करेल.

६. **आर्थिक तरतुद** - दैनिक/मासिक देखभाल करण्याकरिता वार्षिक अंदाजपत्रकात आर्थिक तरतुद करण्याची कार्यवाही नियंत्रण अधिकाऱ्यांच्या मार्फत प्रती वर्षी केली जाईल.

७. **तक्रार नोंदवही** - आधुनिक मसाज उपकरणांचा वापर करतांना तक्रार नोंदवही ठेवावी लागेल. ज्यामध्ये संयत्र व उपकरणे या संबंधीच्या तक्रारीची नोंद घेतली जाईल ज्यावर त्यास नियंत्रण अधिकाऱ्यांची स्वाक्षरी प्राप्त करावी लागेल.

८. **उपकरणांचा रखरखाव**- प्रभारी व्यक्तीस आधुनिक मसाज उपकरणे सुयोग्य पद्धतीने ठेवावे लागतील.

९. **रखरखावाचे प्रमाणिकरण** – नियुक्त व्यक्तीद्वारे करण्यात आलेल्या रखरखावाचे प्रमाणिकरण नियंत्रण अधिकाऱ्यास सादर करेल.

१०. **रखरखावाचा अहवाल** - प्रत्येक महिन्याचे ०५ तारखेला प्रभारी व्यक्तीला रखरखावाचा अहवाल नियंत्रण अधिकाऱ्यास सादर करावा लागेल.

११. **मसाज उपकरणांमध्ये बिघाड** - मसाज उपकरणांमध्ये बिघाड झाल्यानंतर बदलविण्यात आलेले सुटे भाग प्रभारी व्यक्ती नियंत्रण अधिकाऱ्यांकडे तपासणी व खात्रीकरिता जमा करेल. बिघाड झालेले सुटे भाग समान लेखा संहितेतील तरतुदीनुसार अपलेखित करण्याची कार्यवाही केली जाईल.

१२. **जिवित अथवा वित्त हानी** - आधुनिक मसाज उपकरणांचा लाभ घेणाऱ्या व्यक्तीची जिवित अथवा वित्त हानी झाल्यास त्यास विद्यापीठ आरोग्य केंद्र तसेच प्रशासन जबाबदार राहणार नाही.

१३. **नेमण्यात येणारा व्यक्ती त्याची उपस्थिती नोंद**- आरोग्य केंद्रात आधुनिक मसाज उपकरणे हाताळण्याकरीता नेमण्यात येणारा व्यक्ती त्याची उपस्थिती, कार्यपद्धती यावर नियंत्रण अधिकाऱ्यांचे नियंत्रण राहील.

१४. प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यात यासंदर्भातील वार्षिक अहवाल कुलसचिव व मा.कुलगुरू यांना विचारार्थ सादर करण्यात यावा.

१५. **(a) सदस्यत्व शुल्क –** विविध आधुनिक मसाज उपकरणांचा वापर करण्याबाबत सदस्यत्व शुल्कात आवश्यकतेनुसार वेळोवेळी मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार वाढ करण्यात येईल व त्याबाबतचे शुल्क आकारण्यात येईल. **मसाज उपकरणांचा उपयोग करणाऱ्या सदस्यांस मसाज उपकरण क्र. १ (फुट मसाजर) १५ मिनीटकरीता उपयोग शुल्क रू. ५०/- (अक्षरी रूपये ५० फक्त) तसेच मसाज उपकरण क्र. २ (बॉडी मसाजर) १५ मिनीटकरीता उपयोग शुल्क रू. १००/- आकारण्यात येईल.**

(b) आधुनिक मसाज उपकरणे वापरण्याबाबतचा कालावधी – सदस्यांना दुपारी १.०० ते २.०० व सायंकाळी ४.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीमध्येच मसाज उपकरणांचा लाभ घेता येईल. प्रत्येक सदस्यास मसाज उपकरणे वापरण्याकरीता एकूण २० मिनीटांचा कालावधी राहील. तसेच २६ जानेवारी, १५ ऑगष्ट, ०१ मे, होळी आणि धुलीवंदन तसेच इतर शासकीय सुटीच्या दिवशी मसाज उपकरणांचा वापर करता येणार नाही. हे दिवस वगळता उपलब्ध करून दिला जाईल. ठरवून दिलेल्या वेळेव्यतिरिक्त सदस्यांना इतर वेळेमध्ये मसाज उपकरणे वापण्याबाबत अनुमती दिल्या जाणार नाही.

१६. **उपकरणांचे ज्ञान** - आधुनिक मसाज उपकरण वापरण्याकरीता सदस्यांना उपकरणांचे ज्ञान विद्यापीठ आरोग्य अधिकारी अथवा उपकरण हाताळण्याकरिता नेमून दिलेल्या तज्ञ कर्मचारी यांचेकडून प्राप्त करून घेणे अनिवार्य आहे.

१७. **शुल्क परतावा** - आधुनिक मसाज उपकरण कोणत्याही कारणास्तव बंद पडल्यास त्या कालावधीतील शुल्क कोणत्याही सबबीवर परत केल्या जाणार नाही.

१८. **विहित ओळखपत्र** - प्रत्येक सदस्याने आधुनिक मसाज उपकरणांचा उपयोग घेण्याकरिता विद्यापीठाने त्यांना प्रदान केलेले विहित ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील व त्याशिवाय त्यास प्रवेश दिला जाणार नाही. विद्यापीठ आरोग्य अधिकारी यांनी नेमून दिलेल्या व्यक्ती तपासणी करण्याकरिता आल्यास त्यांना ओळखपत्राची मागणी करू शकेल.

१९. आगाऊ स्वरूपात भरलेली कोणतीही रक्कम कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाही.

२०. **त्वचारोग अथवा संसर्गजन्य रोग** - आधुनिक मसाज उपकरणांचा लाभ घेत असतांना सदस्याला कुठलाही त्वचारोग अथवा संसर्गजन्या रोग असल्यास त्याला मसाज उपकरणांचा लाभ घेण्याकरिता प्रवेश देणे अथवा नाकारणे याचे अधिकार विद्यापीठ आरोग्य अधिकारी यांना राहील.

२१. **पेहराव- सदस्याने आधुनिक मसाज उपकरणांचा उपयोग घेत असतांना स्वच्छ नॅपकीन, टॉवेल, हातमोजे, पायमोजे नियमित स्वरूपात आणणे अनिवार्य आहे. तसेच सदस्यांना त्वचेचे आजार, शरीरावर जखम, घाव, फोड, फुटकळी, संसर्ग आजार, डोळ्याचा संसर्गजन्य रोग नसल्याबाबतचे तसेच दमा, मिरगी, शरीरामध्ये अपघातानंतर ऑपरेशनचे वेळी टाकण्यात आलेले रॉड्स, हृदयरोगासंबंधी असलेले आजार त्याचप्रमाणे पेसमेकर इत्यादीबाबत सर्वप्रथम विद्यापीठ आरोग्य अधिकारी यांना माहिती देणे अनिवार्य राहील. यापैकी कोणताही आजार असल्यास सदस्यास प्रवेश देण्याबाबतचे अथवा नाकारण्याबाबतचे सर्व अधिकार आरोग्य अधिकारी यांचे राहील.**

२२. **अनुशासन** - आधुनिक मसाज उपकरणांचा वापर करतेवेळी फाजील प्रोत्साहित करणे, कुठल्याही बंदी असलेल्या वैद्यकीय औषधांचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास त्यांना प्रवेश नाकारण्यात येईल. मसाज उपकरणांचा वापर करण्याबाबत आरोग्य अधिकारी अथवा संबंधित कर्मचारी यांचेसोबत कुठल्याही प्रकारचा वादविवाद होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक राहील.

२३. **परिक्षेत्रात धुम्रपान, मद्यपान** - विद्यापीठ आरोग्य केंद्रात अथवा आरोग्य केंद्राच्या परिसरात धुम्रपानास, मद्यपानास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास संबंधितांना प्रवेश नाकारण्यात येईल व त्याबद्दल भरलेल्या शुल्काचा परतावा कोणत्याही सबबीवर परत केला जाणार नाही.

२४. **ओळखपत्र** – विद्यापीठ आरोग्य केंद्रात आधुनिक मसाज उपकरणांचा उपयोग घेतांना विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र नेहमी सोबत ठेवणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

२५. **मौल्यवान वस्तु** – विद्यापीठ आरोग्य केंद्रातील आधुनिक मसाज उपकरणे वापरण्याकरीता किंमती वस्तु, सोन्या-चांदीचे दागीने, घड्याळ, मोबाईल इत्यादी वस्तु आणू नये. आणल्यास त्या वस्तु सुरक्षित सांभाळण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित सदस्यांची राहील व गहाळ झाल्यास आरोग्य अधिकारी अथवा त्यांनी नेमून दिलेले संबंधित कर्मचारी अथवा विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.

२६. **सहकार्य** – विद्यापीठ आरोग्य केंद्रा तसेच मसाज उपकरणे सुव्यवस्थित, स्वच्छ ठेवण्यास प्रत्येक सदस्यांनी योग्य ते सहकार्य करणे गरजेचे राहील.

२७. **आधुनिक मसाज (Fitness Unit) उपकरणांचा उपयोग** – विद्यापीठातील आरोग्य केंद्रातील आधुनिक मसाज उपकरणे कुठल्याही तांत्रिक, अतांत्रिक तथा नैसर्गिक कारणास्तव बंद ठेवण्याची आवश्यकता भासल्यास त्याबाबतचे सर्वाधिकार विद्यापीठ आरोग्य अधिकारी यांचेकडे राहतील.

२८. ज्या कोणत्याही व्यक्तीस मसाज उपकरणे हाताळावयाचे / वापरावयाचे असल्यास त्यांनी परिशिष्ट - अ मधील आवेदन पत्र व ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२९. आवेदन पत्र मंजुरीनंतरच व दिलेल्या वेळेत विहीत केलेल्या तारखेप्रमाणेच उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

*****

(परिशिष्ट - अ)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

आरोग्य केंद्रातील मसाज उपकरणे हाताळण्याबाबतचे आवेदन पत्र तसेच ना हरकत प्रमाणपत्र

(पहा- विनियम क्र. ३०/२०२५)

प्रति,

मा. कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

मार्फत :- नियंत्रण अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
विषय :- मसाज उपकरणे हाताळण्याबाबतचे आवेदन पत्र तसेच ना हरकत प्रमाणपाबाबत..

महोदय/महोदया,

मी, खालील सही करणार विनंतीपूर्वक अर्ज करतो की, मी (नामे) ---------- **विनियम क्रमांक ३०/२०२५** मधील अटी व शर्तींचे अधीन राहूनआरोग्य केंद्रातील मसाज उपकरणे हाताळण्याबाबत इच्छुक आहे. त्याकरीता मी आवश्यक व निर्धारित केलेले शुल्क मसाज उपकरण क्र. १ (रू. ५०/-फक्त) किंवा मसाज उपकरण क्र. २ (रू. १००/- फक्त) विद्यापीठ खाती जमा करण्यास तयार आहे/आहो. त्याचप्रमाणे विनियमामधील आवश्यक सुचनांचे पालन करण्यास मी तयार आहे/आहो. माझी वैयक्तीक माहिती खालीलप्रमाणे आहे.

माझी वैयक्तीक माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) आवेदकाचे पूर्ण नांव :- ----------

२) पद व कार्यरत विभाग /शैक्षणिक विभाग :- ----------

३) कायमचा राहीवासी पत्ता :- ----------
---

४) जन्मतारीख :- ----------

५) यापुर्वी कोणत्याही प्रकारचा आजार उद्‌भवलेला आहे काय ? :- **होय / नाही**

६) असल्यास त्या आजाराचे नाव :- ----------

७) आजाराचे औषधोपचार सुरू आहे काय ? :- **होय / नाही**

-- ना-हरकत प्रमाणपत्र --

मी असे लिहून देतो की, मी आरोग्य केंद्रातील मसाज उपकरणांचा उपयोग **विनियम क्रमांक ३०/२०२५** मधील अटी व शर्तींचे तसेच आरोग्य अधिकाऱ्यांचे मंजुरीचे अधीन राहून उपकरणे हाताळण्यास तयार आहो. तसेच उपकरणे हाताळतेवेळी उपकरणांचे नुकसान झाल्यास अथवा मला यापूर्वी असलेला कोणत्याही प्रकारच्या आजाराबद्दल माहिती दिली नाही परंतू माझेबद्दल काही वैद्यकिय समस्या निर्माण झाल्यास त्याबाबत मी स्वतः जबाबदार राहील. त्याकरिता आरोग्य केंद्र किंवा विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही व कोणत्याही प्रकारच्या आर्थिक किंवा वैद्यकिय नुकसान भरपाईची मागणी करणार नाही त्याबाबतचे मी हे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करीत आहे/ आहो.

दिनांक :- स्वाक्षरी

नांव (----------)

सही व शिक्का
आरोग्य अधिकारी